MHKO070015742025

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | :- | ११.०७.२०२५ | | |
| नोंदणी दिनांक | :- | ११.०७.२०२५ | | |
| निकाल दिनांक | :- | ०६.०५.२०२६ | | |
| कालावधी | :- | वर्ष | महिने | दिवस |
| | | ०० | ०९ | २६ |

**भाग– 'अ'**

**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)**

**(घोषित दिनांकः–०६/०५/२०२६)**

**जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि. कोल्हापूर येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,न्यायालय क्र.२ यांचे न्यायालयात.**

**( पीठासीन अधिकारी एम.एस.पाटील)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७०८/२०२५** **निशाणी क्र.६/ब**

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी/तक्रारदार** | | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>जयसिंगपूर पोलीस ठाणे,<br>ता.शिरोळ, जि.कोल्हापूर |
| **अभियोग पक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्रीमती एल.एस.सदरेकर |
| **आरोपी** | | **साहील झाकीर काझी,**<br>वय वर्षे–२७, धंदा– मजुरी,<br>रा. गल्ली नं.१३, जयसिंगपूर,<br>ता.शिरोळ, जि.कोल्हापूर |

| | | |
|---|---|---|
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्रीमती पी.डी.सुर्यवंशी |

## भाग– 'ब'

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २५/०२/२०२५ |
| गुन्हा नोंद केल्याची तारीख | २५/०२/२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख | ११/०७/२०२५ |
| गुन्हयाचा सारांश ठेवल्याची तारीख | १९/११/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १२/०२/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची तारीख | ०६/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६/०५/२०२६ |
| शिक्षा सुनावली असल्यास, त्याची तारीख | – |

## आरोपीचा तपशील

| अ.क्र. | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर मुक्त केल्याची तारीख | गुन्हयाच्या सारांशचे कलम | निर्दोष की दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | वजावट कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **साहील झाकीर काझी** | बी.एन.एस.एस. ३५ (३) नोटीस दिली आहे. | २०.०९. २०२५ | महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे. | निर्दोष | – | – |

## भाग– 'क'
## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अभियोग पक्षाचा सा.क्र. १ | प्रकाश महादेव पाटील | पंच साक्षीदार |

**(ब) बचाव पक्षातर्फे साक्षीदार : निरंक.**

**(क) न्यायालया तर्फे साक्षीदार : निरंक.**

**फिर्यादी/बचाव पक्ष/ न्यायालयीन निशाणी क्रमांक**

**(अ) अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांक :**

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | ८ | सा.क्र.१ यांची पंचनामेवरील सही. |

**(ब) बचाव पक्षातर्फे निशाणी : निरंक.**

**(क) न्यायालयातर्फे निशाणी : निरंक**

**(ड) महत्वपूर्ण वस्तू : निरंक.**

==========================================

**न्यायनिर्णय**

**(घोषित दि.०६/०५/२०२६)**

==========================================

आरोपीविरुध्द महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) नुसार शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केल्याचा आरोप आहे.

२. अभियोगपक्षाची हकिकत, पुरावा व उभय पक्षांच्या वकिलांच्या युक्तिवादानंतर

माझ्या विचाराधीन आलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष विवेचनासह खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दि.२५.०२.२०२५ रोजी ११.३० वा. सुमारास घटनास्थळी आरोपी हा स्वतःचे फायदयाकरीता लोकांचेकडून पैसे घेवुन व त्यांना कल्याण जुगाराच्या आकडयाच्या चिठ्ठया देवुन कल्याण मटका खेळ चालवित असताना मिळून आल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| २ | काय आदेश? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## का र ण मि मां सा

**३.** आरोपीविरूध्द ठेवलेला आरोप सिध्द करण्याकामी अभियोग पक्षाने केवळ एक साक्षीदार नामे प्रकाश महादेव पाटील (सा.क्र.१) जप्ती पंच यांची साक्ष नि.६ कडे नोंदविली. त्यानंतर अभियोगपक्षास पुरेशी संधी देवूनही साक्षीदार हजर न केल्याने मी नि.१ वरील आदेशान्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. अभियोगपक्षाच्या पुराव्यात आरोपीविरूध्द दोषदर्शक पुरावा न आल्याने आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ३५१ अन्वये निवेदन वगळण्यात आले.

**मुद्दा क्रमांक १ करिता**

**४.** साक्षीदार क्र.१ प्रकाश महादेव पाटील यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये कथन केले आहे की, दि.२५/०२/२०२५ रोजी त्यांना कोणी कोठे बोलावले होते हे त्यांच्या लक्षात नाही. ते तुम्हाला ओळखत नाहीत. पोलीसांनी

त्यादिवशी त्यांचेसमक्ष जप्ती पंचनामा जयसिंगपूर पोलीसांनी त्यांना पोलीस स्टेशन येथे बोलावले होते. पोलीसांनी त्यांची एका पेपरवर सही घेतली. तसेच त्यांनी त्यांची जप्ती पंचनाम्यावरील सही मान्य केली. परंतु त्यातील मजकूराबाबत त्यांना काहीही माहिती नसल्याचे कथन त्यांनी केले आहे. अभियोगपक्षातर्फे साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारले असता अभियोगपक्षाच्या लाभात कोणताही कबुली जबाब त्यांच्या मुखातुन मिळु शकला नाही. त्यांनी त्यांच्या समक्ष मुद्देमाल जप्त केल्याचे सांगितले नाही.

**५.** अभियोगपक्षाने केवळ एक साक्षीदार तपासला आहे व त्याने देखील अभियोगपक्षास पुष्टी देणारा पुरावा दिला नाही. या व्यतिरिक्त फिर्यादी, तपासी अधिकारी किंवा इतर स्वतंत्र साक्षीदार अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आले नाहीत. त्यामुळे सदर प्रकरणातील नमुद घटनेबाबत संशय निर्माण होतो. या व्यतिरिक्त जप्त केलेल्या मुद्देमालाचा पंचनामा अभियोगपक्षाने स्वतंत्र साक्षीदारामार्फत सिध्द केला नाही. सदरील महाराष्ट्र जुगार कायद्या अंतर्गतचा गुन्हा सिध्द होण्यासाठी आरोपी हे सार्वजनिक ठिकाणी लोकांचेकडून पैसे घेवुन व त्यांना कल्याण जुगाराच्या आकडयाच्या चिठ्ठया देवुन कल्याण मटका खेळ खेळत होते ही बाब सिध्द होणे आवश्यक आहे. सदर बाब सर्व संशयाच्या पलीकडे सिध्द करणारा पुरावा अभियोगपक्षाने दिल्याचे प्रस्तुत प्रकरणातील उपलब्ध पुराव्याचे अवलोकन करता दिसून येत नाही. त्यामुळे एकंदर अभिलेखावरील उपलब्ध तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता अभियोगपक्षाने आरोपींवर ठेवण्यात आलेला आरोप सक्षम व परिपोषक साक्षीपुराव्यानिशी निसंदिग्धपणे सिध्द केला नाही असे माझे मत आहे. सबब मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नाही असे नोंदवित आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल खालीप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## :: आदेश ::

१. आरोपी **साहील झाकीर काझी** यांची महाराष्ट्र जुगारबंदी कायदा कलम १२ (अ) अंतर्भुत वर्णिलेल्या अपराधातुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७८(१) मधील प्रावधानीत तरतुदीनुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. अभिकथीत जप्त मुद्देमाल रोख रक्कम रु.१४५०/– ही अपील कालावधीनंतर सरकार जमा करावी. जप्त मुद्देमाल कल्याण मटका चिठ्ठया, एक बॉलपेन हे मूल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नाश करावे.

३. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात येतो.

४. आरोपीनेभारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे सहा महिन्याच्या कालावधीकरीता रक्कम रु.१५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र दयावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात देण्यात व घोषीत करण्यात आला)

PATIL MAYUR SAMPAT
Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT
Date: 2026.05.06 16:06:31 +0530

**(एम.एस.पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय क्र.२
जयसिंगपूर

दिनांक: ०६ /०५/२०२६